# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक बांधकाम विभाग
# कार्यकारी अभियंता
# सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली
# नागरी सनद
## सुची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग हिंगोली कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | |
| ३ | कार्यकारी अभियंता सा.बां.विभागाची रचना | |
| ४ | विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक माहितीची सुलभता व खाजगीकरण | |
| ५ | विभागाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | |
| ६ | गाऱ्हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सुचना | |
| ७ | सनदेची अमलबजावणी व प्रतिसाद | |
| ८ | परिशिष्टे | |

# सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली
## नागरी सनद

१) प्रस्तावना

सार्वजनिक बांधकाम विभागाला १५० वर्षाहुन अधिक वर्षाची दैदिप्तमान व गौरवशाली परंपरा आहे महाराष्ट्रातील सर्व महत्वाचे रस्ते, पुले व इमारती उभारण्याचे श्रेय बांधकाम विभागाकडे जाते. त्यामुळे शेती, औद्योगिक प्रगतीला उत्तम चालना मिळते व राष्ट्र सर्वकंष उन्नतीकडे वाटचाल करत आहे.

हिंगोली जिल्हा सन १ मे १९९९ रोजी नवनिर्मीत जिल्हा म्हणून परभणी जिल्हयातून स्वतंत्र करण्यात आला हा मराठवाड्याच्या आग्नेय दिशेस येतो. उस, केळी व कापसाची मोठी बाजारपेठ हिंगोली जिल्ह्यास लाभलेली आहे. हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ हे ८ वे ज्योतीर्लिंग असून, संत श्री. नामदेव महाराज जन्मस्थान नर्सी नामदेव, औंढा तालुक्यातील सिध्देश्वर धरण, वसमत येथील दमदमा गुरूद्वारा, कळमनुरी तालुक्यातील येहळेगांव तुकाराम, डोंगरकडा येथील श्री. जटाशंकर मंदिर व शिरडशहापुर येथील जैन मंदिर सर्वसामान्यात प्रसिध्द आहेत. हिंगोली शहर हि जुनी व्यापारी बाजारपेठ म्हणून प्रसिध्द आहे. या शहरातून जाणारा रा.मा. २०४ हा आंध्रप्रदेश, विदर्भ, मध्यप्रदेश जोडणारा राज्य मार्ग आहे. नांदेड येथील प्रसिध्द सचखंड गुरूद्वारा साठी लाखो भाविक पंजाब मधुन हिंगोली मार्गे नांदेडला जातात.

हिंगोली येथे सन १९९५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यान्वित झाले या विभागाच्या अधिपत्याखाली हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा (ना.) व पूर्णा जि.परभणी ही पाच उपविभाग कार्यरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली अकोला रस्त्यावर शिवाजी नगर भागात आहे. या विभागा मार्फत गोदावरी नदीवर महत्वाचे जिल्हे

जोडणारे तीन पुले व पूर्णा नदीवर मोठा पुल बांधण्याचे काम या विभागा मार्फत झाले. तसेच हिंगोली येथे प्रशासकीय तथा जिल्हाधिकारी कार्यालयाची प्रशस्त इमारत महाराष्ट्रात सर्वप्रथम बांधली हि इमारत पाहण्यासाठी गोवा राज्याचे अधिकारी मुद्यामहून आले होते ही अभिमानाची बाब आहे.

हिंगोली जिल्ह्या अंतर्गत हिंगोली, कळमनुरी, वसमत, सेनगांव व औंढा (ना.) अशी हिंगोली सह पांच तालुके आहेत. हिंगोली व सेनगांव तालुक्या साठी सा.बां.उपविभाग हिंगोली कार्यरत आहे. उर्वरीत तालुक्यांसाठी तालुक्याच्या मुख्यालयी उपविभाग कार्यरत असून परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथिल उपविभाग या विभागाच्या अधिपत्याखाली येतो.

या विभागाकडून विविध शासकीय खात्याच्या मुख्य इमारती, महत्वाचे रस्ते मोठे व लहान पुल बांधण्याची कामे व अस्तित्वातील इमारती व रस्ते पुलांची देखभाल दुरूस्तीची कामे करण्यात येतात.

या विभागाच्या कार्यक्षेत्रात प्रमुख राज्य मार्ग १७.६० कि.मी. राज्य मार्ग ४६०.२५ कि.मी. प्रमुख जिल्हा मार्ग १०३.२० कि.मी. अशा विविध दर्जाची एकुण लांबी ५८१.०५ कि.मी. आहे. या रस्ते लांबीत सर्वसाधारणपणे १० मोठे पुल, १०८ मध्यम पुल, ६०६ नळकांडी पुले आहेत. तसेच कार्यालयीन इमारती ६४०११.०८ चौ.मी. निवासी इमारती ७७१४७.७८ चौ.मी. अशा एकुण १४११५८.८६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या राज्यक्षेत्रातील इमारतीची देखभाल व दुरूस्ती करण्यात येते.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम हिंगोली या जिल्हयातील सार्वजनिक बांधकामाच्या अनुषंगाने नागरीकाशी बांधीलकी जपण्यास कटिबध्द आहे. ही बांधीलकी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग हिंगोली या सनदेद्वारे जाहीर करत असुन ती स्विकारीत आहे. हे कार्यालय नागरीकांना खालील सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम

विभागाने निर्धारीत केलेल्या व पथदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्य पूर्वक व सन्मान पूर्वक वागणूकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरीकांचे प्रश्न सहानुभुती पूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेऊन तसेच सर्व सामान्य नागरीकांसाठी ही सदन तयार करण्यात आली आहे.

१) विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील मार्गाची देखभाल दुरूस्ती मानका प्रमाणे करून रस्त्याचा दर्जा उत्तम राखने.

२) कार्यालयीन विभागाच्या अखत्यारीतील शासकीय इमारतीची (कार्यालयीन व निवासी इमारती) बांधकाम खात्याने ठरवलेलया मानका नुसार उत्तम दर्जाची व सुरक्षीत अशी करणे.

३) या विभागाच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या सा.बां.उपविभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय कामकाजात सुसुत्रता ठेवणे.

४) या विभागाच्या कार्यालयात प्रतिसादर वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५) आपत्कालीन व्यवस्थेसाठी (जसे महापुरामुळे वाहतुक बंद पडलेल्या रस्त्याची दुरूस्ती करून वाहतुक चालू करणे ) तत्परतेने अभियांत्रीकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे.

६) विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

७) या विभागीय कार्यालयात ठरवुन दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी / तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

८) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागाच्या अखत्यारीतील उप अभियंता यांचे कडुन मागितलेली माहिती संबंधीतांना विहीत मुदतीत उपलब्ध करून देणे.

९) कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवुन व आधुनिकता आणुन या विभागीय कार्यालयाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१०) संगणीकरणा बाबत या विभागाच्या अंतर्गत सर्व उप अभियंता कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे, अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ नांदेड यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

११) या कार्यालयाच्या अंतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१२) कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करून अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

१३) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

(२) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग हिंगोली कार्यालयाची बांधीलकी व नागरिकांची जबाबदारी.

➢ **<u>कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग हिंगोली कार्यालयीच बांधीलकी :-</u>**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधलकी ठेवील.

ब) सौजन्यपूर्ण व मदतीची भावना ठेवुन कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवतील यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे / ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्या साठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलबध करण्यात येतील.

➢ **<u>नागरिकांची जबाबदारी :-</u>**

१) शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणुक सौजन्यपूर्वक असावी.

२) नागरिकांकडुन आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

३) नागरीकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

४) विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरू नये.

५) सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

६) नागरीकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दुर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करू नयेत.

७) रस्त्यांच्या दोन्ही बाजुंना असणाऱ्या वृक्षरायीचे जतन करणे ही नागरकिांची सुध्दा जबाबदारी राहील.

८) नागरीकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

९) नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**(३) <u>कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली कार्यालयाची रचना.</u>**

अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ नांदेड यांच्या अधिपत्या खाली कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली हे कार्यालय सन १९९५ मध्ये हिंगोली येथे कार्यान्वीत झाले. या विभागाच्या अधिपत्याखाली हिंगोली, कळमनुरी, वसमत, औंढा (ना.) व पुर्णा जि. परभणी ही पाच उपविभाग कार्यरत आहेत. हिंगोली आणि सेनगांव साठी हिंगोली येथे उपविभाग कार्यरत असुन कळमनुरी, वसमत, औंढा, व परभणी जिल्हयातील पुर्णा या तालुक्याच्या मुख्यालयी त्या तालुक्या करीता उपविभाग कार्यरत आहेत. या विभागाच्या अधिपत्या खाली वरिल पाच उपविभाग कार्यरत आहेत. तसेच कार्यकारी अभियंता व उप अभियंता

यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता ( Tree Chart ) परिशिष्ट अ म्हणुन सोबत जोडला आहे.

या विभागाच्या अधीकार क्षेत्रातील उप अभियंता सा.बां.विभाग हा खऱ्या अर्थाने माहितीचा श्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरूवाती पासुन उप अभियंता यांचे कार्यालया कडुन मिळू शकते. प्रस्तावित नमुद केलेल्या सार्वजनिक सेवा उप अभियंता, सा.बां. उपविभाग पुरवित असतो. या विभागा अंतर्गत कामाच्या अंमलबजावणी साठी सा.बां.नियमावली लेखा संहिता, विनिदेश वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रीय कार्यालयाकडुन केले जाते.

**(४) <u>विभागांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक व माहितीची सुलभता.</u>**

अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक :-

कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील, विविध ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादीची माहिती, तसेच रस्ते, पुल व इमारती आणि इतर कामा विषयी माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रक (परिशिष्ठ ब) नमुद केले आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरून संबंधीत उप विभागीय कार्यालयात मिळु शकेल. नैसर्गिक आपत्ती कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादी उद्भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकेल.

**ब) माहितीची सुलभताः-**

सार्वजनिक बांधकाम ( www.mahapwd.com ) या वेबसाईटवरून (संकेतस्थळा वरून ) वेळोवेळी सादर केल्या जाणाऱ्या विभागांतर्गत

माहितीचा तपशिल व आकडेवारीचा तपशिल जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

(५) **कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली कार्यलयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितताः-**

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करून रस्त्यावरील अपघात प्रवण स्थळे, शोधने व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाय योजना सुचविते.

समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारण टप्या टप्याने हाती घेण्यात येते. तपशिलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यावर लावले जातील, जेणे करून रस्ते वाहतुकीस पादचाऱ्यांसह सर्वाना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

**(६) गाऱ्हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्यांच्या सचुना**

**अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य कांही गाऱ्हाणी विभागा बाबत अथवा कांही कामा बाबत तक्रारी असतील तर त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालया विरूध्द गाऱ्हाणे / तक्रार असेल तर त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालय प्रमुखाकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदा. उप विभाागीय कार्यालया विरूध्द गाऱ्हाणे / तक्रारी असलयास विभागीय कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचे कडे गाऱ्हाणे / तक्रारी असलयास विभागीय कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचे कडे गाऱ्हाणे मांडावे तक्रार नोंदवावी. अशा गाऱ्हाणी / तक्रारीचे निराकरण वरिष्ठ कार्यालया कडुन ७ दिवसात करण्यात येईल गाऱ्हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक उपविभागीय कार्यालयात स्वतंत्र

तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे. गाऱ्हाणी समक्ष भेटीत / पत्राने वा ई-मेल द्वारे नागरिक मांडु शकतात.

**ब) नागरीकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन :-**

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्तते बाबतचा तथा परिमाण कारकतेचा आढावा कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

**क) जनसामान्यांकडून सुचना :-**

या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहुन कांही नवीन कार्यदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**(७) नागरीकांच्या सनदेची अमलबजावणी :-**


सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत या विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अमलबजावणी करण्यास कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली हा विभाग कटीबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा यथोचित आदर करून आवश्यक बदल करण्यात येतील. कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली खात्रीपुर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची कामे देत आहेत. या विभागाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सोजन्यपुर्वक व मदत करण्याच्या भावनेने वर्तणुक मिळेल कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख सुलभ व आटोपशिर करण्यासाठी

नागरीकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यांत येईल. तसेच नागरिकांच्या गाऱ्हाण्यांचे कालबध्द निराकरण करण्यात येईल.

**(८) परिशिष्टे**

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता ( Tree Chart )

ब) कार्यपुर्तीचे वेळापत्रक



# परिशिष्ट - ब

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव व हुद्या | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांवे व हुद्या |
|---|---|---|---|---|
| १ | कंत्राटदार वर्ग ८,९ आणि मजुर कामगार सहकारी संस्था वर्ग ब यांचे वर्गीकरण व नुतनीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ३० दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| २ | विश्रामगृहाचे आरक्षण पत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ७ दिवस शिवाय ऑन लाईन आरक्षणही उपलब्ध | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ३ | रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतीच्या ना हरकत परवाना | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ३० दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ४ | चल चित्रपट गृहाचे योग्यता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ५ | सरकारी इमारतीचे ना उपलब्धता प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ६ | सरकारी निवासस्थान न मिळण्याचे प्रमाणपत्र (अनुपलब्धता) | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ७ दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ७ | सरकारी निवासस्थानी राहणाऱ्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या बाबतचे ना हरकत दाखल | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ३० दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ८ | रास्त भाडे / प्रमाण भाडे प्रमाणपत्र | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ९ | इमारतीच्या भाड्यांचे निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| १० | इमारतीचे मुल्य निश्चितीकरण | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ३० दिवस | अधीक्षक अभियंता सा.बां.मं.नांदेड |
| ११ | रस्ता खोदाई करून पाईप टाकण्यास परवानगी | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १० दिवस | - |
| १२ | पिकअप शेड बाबत परवाना | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १० दिवस | - |
| १३ | माल पुरविण्याचे देयके | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | - |
| १४ | शासकीय हद्यातील व्यवसाया करीता जागा भाड्याने देणे | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १० दिवस | - |
| १५ | ना हरकत दाखल | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ३० दिवस | - |
| १६ | मोठया कामाची अंतिम देयके ब-१ | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | ९० दिवस | - |
| १७ | अनामत रक्कमइ परत करणे बाबत | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | - |
| १८ | जुन्या साहित्यांचे / गवतांचे झाडांचे फळांचे लिलाव | कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग हिंगोली | १५ दिवस | - |

# परिशिष्ट - ब

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांवे व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १९ | जन माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती | उप कार्यकारी अभियंता सा.बा.उपविभाग हिंगोली | ३० दिवस | - |

टिप :- उपरोक्त कालावधी हा अर्जकाराने विहीन नमुन्यात योग्य ती माहिती व संबंधीत कागदपत्र सादर केले नंतर लागणारा कालावधी आहे.